**“मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेकरीता “सार्वजनिक बांधकाम विभागाचा” कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून समावेश करण्यास मान्यता देण्याबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: लवेसू २०२५/प्र.क्र.०२ (E१६६२६५५) /पाणंद रस्ते**
पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२
तारीख: २२ जून, २०२६

**वाचा :-**

१. महसूल व वन विभाग, शा.नि. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र. ०२/पाणंद रस्ते, दि. १४.१२.२०२५
२. महसूल व वन विभाग, शा.नि. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र. ०२/पाणंद रस्ते, दि. ०७.०१.२०२६
३. महसूल व वन विभाग, शा. शु. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र. ०२/पाणंद रस्ते, दि. १८.०२.२०२६
४. महसूल व वन विभाग, शा. शु. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र. ०२/पाणंद रस्ते, दि. २५.०३.२०२६
५. महसूल व वन विभाग, शा. शु. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र. ०२/पाणंद रस्ते, दि. १५.०४.२०२६

**प्रस्तावना -**

ग्रामीण भागात शेत/पाणंद रस्त्यांची असलेली आवश्यकता, त्यांचे महत्व व सद्यःस्थितीत शेत/पाणंद रस्त्याच्या कामांकरिता मनरेगा अंतर्गत येणा-या अडचणी विचारात घेता पूर्णपणे यंत्रसामुग्रीचा वापर करुन शेत/पाणंद रस्ते तयार करण्यासाठी महसूल विभागामार्फत "मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना" ही स्वतंत्र योजना राबविण्यास मंत्रिमंडळाने दि.०७.१२.२०२५ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. याअनुषंगाने दिनांक १४.१२.२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अधिक सुसूत्रता आणण्यासाठी दिनांक १४.१२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये दि. ०७.०१.२०२६, दि.१८.०२.२०२६ दि.२५.०३.२०२६ व दि. १५.०४.२०२६ रोजी सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. “मुख्यमंत्री - बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना” कार्यक्रमांतर्गत रस्त्यांची कामे करण्याकरीता खालील कार्यान्वयीन यंत्रणा निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

i) ग्रामपंचायत
ii) पंचायत समिती
iii)जिल्हा परिषद बांधकाम विभाग/उपविभाग
iv) प्रधानमंत्री/मुख्यमंत्री ग्रामसडक योजना विभाग
v) वनविभाग (वनजमीन असेल तेथे)
vi) महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे (NMRDA, MMRDA, PMRDA इ.), CIDCO, नागरी क्षेत्रातील इतर प्राधिकरणे इ.

मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेअंतर्गत राज्यात मोठ्या प्रमाणात रस्त्यांची नोंद झाली असून, मोठ्या संख्येमुळे सद्यस्थितीतील कार्यान्वयीन यंत्रणांवर ताण पडत आहे. लोकप्रतिनिधींकडून प्राप्त मागणी आणि राज्याची स्थानिक व भौगोलिक निकड लक्षात घेता, योजना अधिक प्रभावीपणे, दर्जेदार व जलद गतीने पूर्ण करण्यासाठी आता "सार्वजनिक बांधकाम विभागाचा" कार्यान्वयीन यंत्रणामध्ये समावेश करण्याची बाब विचाराधीन होती. याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णयः-**

**"मुख्यमंत्री - बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना"** कार्यक्रमांतर्गत रस्त्यांची कामे करण्याकरीता संदर्भीय क्रमांक १ येथील शासन निर्णयामध्ये परिच्छेद क्रमांक ३ येथील नमूद कार्यान्वयीन यंत्रणांमध्ये अनुक्रमांक ७ येथे सार्वजनिक बांधकाम विभागाचा समावेश करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६२२२१०६२७८५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=C8A7D6860FF227FD9E69A02E9CA5DFB2CCB25EDA92D749629970F349FC6ED260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2026.06.22 21:07:19 +05'30'

**(संजय र. बनकर)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण), यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ), यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा. लोकसभा/राज्यसभा सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,
८. मा. विधानसभा/विधान परिषद सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
१०. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मुंबई,

११.जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२.सर्व विभागीय आयुक्त
१३.सर्व जिल्हाधिकारी.
१४.सर्व पोलीस अधिक्षक
१५.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१६.महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरिता)
१७.महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ व २. मुंबई व नागपूर.
१८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २. मुंबई व नागपूर.
१९.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२०.सर्व उपसचिव/सर्व अवर सचिव व सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग
२१.निवडनस्ती (पाणंद रस्ते)